नि.दि.दा. क्र. २८/२०२३
प्रांजली वि. अशोकराव व ईतर
CNR No.MHWS080034120२3

## निशाणी क्र. २४ खालील आदेश

प्रतिवादी क्र. १ ने सदरचा अर्ज लेखी जवाब दावा दाखल करण्यासाठी केला आहे. त्याच्या कथनानुसार, प्रस्तुत प्रकरण हे अत्यंत गुतांगुतीचे असुन त्यामध्ये लेखी जवाब दाखल करण्यासाठी प्रतिवादी क्र.०१ ला अनेक महत्वाच्या कागदपत्राची आवश्यकता असल्याने लेखी जवाब दाखल करु शकला नाही परंतु दिनांक २९.११.२०२३ रोजी प्रतिवादी क्र.०१ हा लेखी जवाब दाखल करीत असल्याने विना लेखी जवाब आदेश रद्द होवुन लेखी जवाब दाखल करण्यास परवागनी मिळण्याची विनंती केली आहे. याउलट वादीच्या वकीलांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले की, सदर प्रकरणात प्रतिवादी क्र. १ हे दिनांक ३०.०८.२०२३ रोजी हजर झाले असुन आजपावेतो प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या उद्देशाने वेळ घेतला आहे तरी प्रतिवादी क्र. १ यांनी केलेला विलंब माफिचा अर्ज हा वादीच्या हिताचा विचार करुन सदर अर्जावर खर्च लावुन सदर अर्जावर योग्य तो आदेश करावा अशी विनंती केली.

**०२** दोन्ही पक्षाचे कथन ऐकले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने दिनांक १३.०३.२०२३ रोजी सदरचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ०१ दिनांक २५.०७.२०२३ रोजी समन्सची तामिली होऊन तो दिनांक ३०.०८.२०२३ रोजी वकीलांमार्फत प्रकरणात झाला. त्याने नि.क्र. १५ नुसार लेखी जबाब दाखल करण्यास वेळ मागण्याचा अर्ज दाखल केला होता. प्रतिवादी क्र. ०१ ला संधी देऊनही त्याने जवाब दावा दाखल न केल्याने प्रतिवादी क्र. ०१ विरुध्द दिनांक ०४.११.२०२३ रोजी विना लेखी जवाब आदेश पारीत झाला. त्यानंतर दिनांक २९.११.२०२३ रोजी प्रतिवादी क्र. १ च्या वकीलांनी नि.क्र. २४ खाली सदरचा अर्ज करुन लेखी जवाब दाखल करण्यास परवानगी मिळणेचा अर्ज दाखल केला.

**०३** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जरी ९० दिवसांचा कालावधी उलटलेला असला तरी प्रतिवादी क्र.०१ ला कागदपत्र काढण्यास झालेला विलंबाचे कथन बघता नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रकरणाची सद्यस्थिती बघता प्रतिवादी क्र.०१ ला योग्य संधी देण्याच्या उद्देशाने व प्रकरण गुणदोषावर निकाली निघावे

याकरिता मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र. ०१ अर्ज १००/– रुपये खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. वादीला अर्जाचा खर्च अदा केल्यानंतर प्रतिवादीचा जवाब दावा अभिलेखावर घेण्यात यावा.

स्वा/-

(योगेश द. कोईनकर)

दिनांकः १३.१२.२०२३ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, रिसोड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | H.A.Uchade (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 13.12.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 13.12.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 13.12.2023 |